Review Of Research
Vol. 3 | Issue. 8 | May. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# गांधीबाग सहकारी बँक लि. मधील बँकप्रणालीचा व धोरणाचा नागपूर जिल्हयातील महिला बचत गटांच्या कार्यावर होणारे प्रभाव:एक अध्ययन

डॉ. ज्ञानेश्वर पडोळे
व्ही. एम. व्ही महाविद्यालय, नागपूर

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात गांधीबाग सहकारी बँक लि. मधील बँक प्रणालीचा व धोरणाचा नागपूर जिल्हयातील महिला बचत गटांच्या कार्यावर होणारे प्रभाव या विषयावर संशोधकाने संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर केला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी बँकांनी विसाव्या शतकात प्रवेश केलेला आहे. आज देशभरात दोन हजाराहून जास्त सहकारी बँका कार्यरत आहे. सर्वसामान्याच्या हिताची काळजी घेणाऱ्या, सर्वसामान्य आणि दुर्बल घटकांच्या मालकीच्या या संस्था स्वयंपूर्ण आहेत. केवळ उज्वल प्रतिभा आणि गरिब जनतेचा विश्वास यांच्या बळावार आज यां बँकांनी अर्थव्यवस्थेच्या कंठच्छेदी स्पर्धेत प्रगतीचा शिखर गाठलेला आहे.यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता Non-Parametric Chi Square Test (गैर–प्राचल काई वर्ग परिक्षण) यासांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला.

## प्रस्तावना

सहकारी बँक ही अन्य कोणत्याही बँकेसारखे व्यवहार करण्यास मुक्त असते. शिवाय या क्षेत्रातील विशिष्ट गरज लक्षात घेता, काही खास प्रकारच्या आर्थिक संस्थाही तेथे निर्माण झाल्या आहेत असे दिसेल. त्याचप्रमाणे त्या स्वतंत्रपणे ज्यावेळी व्यवहार करीत असतात, त्याच वेळी त्या एकसंघ व्यवस्थेच्या घटक म्हणूनही कार्य करीत असतात. उदाहरणार्थ, प्राथमिक सहकारी पतपेढी ही जिल्हा सहकारी पतपेढीची संलग्न संस्था असते व जिल्हा संस्था ही राज्यासाठी असलेल्या सर्वोच्च सहकारी बँकेची संलग्न संस्था असते. अशी ही वरुन पासून खाली, अंतिम कर्जदार सभासद व्यक्तींच्या

पातळीपर्यंत परस्पनिगडीत संस्थांची बनलेली एक यंत्रणा होय, अल्प मुदतीच्या अर्थपुरवठयासाठी अशी ही व्यवस्था आढळून येते. तशी दीर्घ मुदतीच्या अर्थ पुरवठयासाठीही भू तारण बँकांच्या रुपांत ती अस्तित्वात आहे. सहकारी भू-तारण बँकाचे विशिष्ट स्वरुप सोडले तर कोणत्याही सामान्य आर्थिक संस्था सारखेच या बँकांचे वरुप असते. पण त्यांचे संघटन आणि कार्यक्षेत्र यामध्ये फरक दिसून आल्याविना राहत नाही. अर्थात ज्या विशिष्ट आर्थिक परिस्थितीत त्याचा उगम झाला व त्या प्रगत झाल्या त्याचा परिणाम त्यांच्या संघटनांवर झाल्याविना राहत नाही. लोकांच्या, लोकांनी, लोकांसाठी चालविल्या जाणाऱ्या त्या संस्था असल्यामुळे त्यांच्या गरजांनुसार त्यांचे संघटन, संचालन होणे अपरिहार्य आहे. ज्या सभासदांची मिळून ही संस्था बनलेली असते त्यांचे हितसंबंध किती प्रमाणात संरक्षिले जातात ही अर्थातच त्या संस्थेच्या यशाची कसोटभ मानता येईल. जॉइंट स्टॉक बँक ही भांडवलप्रधान अर्थरचेत भांडवलदारांच्या गरजांना प्राधान्य देणारी संस्था मानली, तर सहकारी बँक अथवा पतपेढी ही मर्यादित उत्पन्न असणाऱ्या गरजू सभासदांची संस्था असते. मग ते शहरातील असोत अथवा ग्रामीण क्षेत्रातील असोत. शेतकरी अथवा लहान उद्योग करणाऱ्या लहान व्यक्ती एकत्र येऊन आपल्या गरजा अशा संस्थांच्या मार्फत मागविण्याचा प्रयत्न करतात. कारण त्यांची दाद मोठया जॉईट स्टॉक बँका घेत नाहीत. आपापल्या लहान लहान बचती एकत्र करुन कर्ज उभारण्याची शक्ती ते वाढवितात व सवलतीच्या दराने व शेतींवर आपापली गरज ते भागवितात. ही सरकारी बँकेमागची मुख्य भूमिका असते. ही सरकारी बँक, पतपेढी, भू तारण बँक, घरबांधणीसाठी अर्थपुरवठा करणारी संस्था, कामगारांची अथवा वैतनिकांची (सॅलरी अर्नर्स) संस्था, नागरी (अर्बन) बँक, धान्य बँक (ग्रेन्स बँक) अशी अनेक विविध रुपे घेऊन कार्य करीत असते. आधी म्हटल्याप्रमाणे व्यक्तींनी स्थापन केलेल्या या संस्था दुय्यम पातळीवर संघरुपाने नवीन संस्था निर्माण करतात. म्हणून त्यांचे प्राथमिक आणि दुय्यम संस्था असे वर्गीकरण करता येते. वास्तविक अर्थाने सहकारी पतपेढी ही प्राथमिक असून दुय्यम पातळीवरील सहकारी पेपेढी ही प्राथमिक असून दुय्यम पातळीवरील सहकारी अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था या बँक म्हणून संबोधण्यास अधिक पात्र असतात.

बचत गटांच्या चळवळीचे जनक नोबेल पुरस्कार विजेते डॉ. महमंद युनूस यांनी महिलांमध्ये बचत गटांच्या माध्यमातून कमालीचा आत्मविश्वास निर्माण केला. ग्रामीण बँकेसारखी संकल्पना राबवून गरिबी निर्मुलनाचा जणू त्यांनी वसाच घेतला. आज जगभरात बचत गटांची चळवळ फोफावली आहे. १९८२ पासून बचत गट स्थापना व निर्मितीस मोठ्या प्रमाणावर वेग आला. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) हे गट आणि बँकांकडून होणाऱ्या पतपुरवठ्याची सांगड घातल्यानंतर बचतगट चळवळ व्यापक होत गेली. देशात एकुन ४० लाख बचत गट आहेत. त्यापैकी ३० लाख गटांना कर्ज व अनुदानापोटी आठ हजार कोटीची मदत शासनाने केली आहे. या वर्षी दहा हजार कोटी रूपयापर्यंत मदतीचा आकडा जाईल. विशेष म्हणजे

कर्ज परतफेड प्रमाणपत्र ८६ टक्के आहे. हे प्रमाण उद्योग शेती कर्जाच्या तुलनेत कौतुकास्पद आहे. महिला बचतगट स्थापल्यामुळे ग्रामीण विभागातील महिलांना आत्मसन्मान मिळाला आहे.

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर बहुतेक जिल्ह्यांमध्ये या बचत गटांचे जाळे पसरले आहे. शेतीच्या उत्पन्नातून किंवा कुटुंबाच्या पारंपारिक व्यवसायातून मिळणारा पैसा घरात खर्च होत असला तरी घरच्या बाईच्या हातात तो नसायचा. तिला तिच्या मर्जीप्रमाणे पैसे खर्च करणे किंवा कुटुंबाच्या कमाईला हातभार लावणे शक्य होत नसे. बचत गटांच्या माध्यमातून पैसा थेट तिच्या हातात गेला. पुरुषांपेक्षा स्त्रिया उत्तम व्यवस्थापक असल्यामुळे त्याचे योग्य नियोजन करुन स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांना एक पर्याय खुला झाला त्यातुनच खूप मेहनतीने खाद्यपदार्थ, उदबत्या, मेणबत्त्या, फराळ, मसाले असे विविध उद्योग महिलांनी उभे करुन स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न केला. अत्यंत गरीब परिस्थितीतून येऊन बचत गटांच्या माध्यमातून स्वत:च्या पायावर उभा राहिलेल्या महिलांच्या यशस्वी कहाण्या महाराष्ट्रामध्ये खुप सांगता येतील.

मात्र गेली २० वर्षे ही चळवळ ज्या पद्धतीने पसरायला हवी होती आणि तिचा उद्देश सफल व्हायला हवा होता, तसा झालेला नाही. बचत गटामुळे गरिबी निर्मूलनही झालेले नाही. किंबहुना राष्ट्रीय बँकाची आडमुटी धोरणे, बचत गटांना सरकारची मदत नसणे, अल्प कर्जपुरवठा संस्थांचे (मायक्रो फायनान्स इन्सिटट्यूट) कर्जाचे अव्वाच्या सव्वा दर आणि राजकीय पक्षांकडून बचत गटांना होणारा वापर अश विविध कारणांमुळे महिला बचत गटांच्या या चळवळीला घरघर लागल्याचे दिसते. या सर्व पार्श्वभुमीवर सदर अभ्याचे महत्व अनन्य साधारण असे आहे.

नागपूर जिल्ह्याची आर्थिक सामाजिक पार्वभुमी इतर जिल्ह्याच्या तुलनेत वेगळी आहे. त्या मुळे महिला बचत गटांची कार्यप्रणाली व त्यांच्या समोरील अळथळे यांचा नागपूर जिल्ह्याच्या पार्श्वभुमीवर अभ्यास करून त्याचा संशोधात्मक निष्कर्ष समोर मांडने खुप गरजेचे आहे.

महिला बचत गटांची आजची स्थिती व भविष्यातील संभावित धोरणात्मक वाटचाल या सर्वाचे शास्त्रीय पद्धतीने विवेचन करून एक दिशादर्शक अभ्यास सर्वांसमोर येणे गरजंचे असल्याने सदर विषयाची निवड महत्वाची ठरते.

**सारणी क्रमांक १:** बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे गांधीबाग सहकारी बँकेचीबँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढझाली असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| बचत गटातील सहभागितेमुळेगांधीबाग सहकारी बँकेचीबँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३२६ | ९३.१ |
| नाही | ८ | २.३ |
| सांगता येत नाही | १६ | ४.६ |
| **एकूण** | **३५०** | **१००** |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे गांधीबाग सहकारी बँकेची बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढझाली असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९३.१ टक्के बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे गांधीबाग सहकारी बँकेचीबँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढझाली आहे. तसेच बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढझाली नसणाऱ्या व या विधानासंबंधी अनिश्चितता दर्शविणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी अनुक्रमे २.३ टक्के व ४.६ टक्के होती. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे गांधीबाग सहकारी बँकेचीबँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढझाली असणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २:** सदस्यांना बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या गांधीबाग सहकारी बँकेच्या विविध योजनांचा लाभ झाला असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| **बचत गटातील सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या गांधीबागसहकारी बँकेच्याविविध योजनांचा लाभ** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | २३९ | ६८.३ |
| नाही | ८१ | २३.१ |
| सांगता येत नाही | ३० | ८.६ |
| **एकूण** | **३५०** | **१००.०** |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या गांधीबाग सहकारी बँकेच्याविविध योजनांचा लाभ झाला असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ६८.३ टक्के बचत गट सदस्यांना गांधीबाग सहकारी बँकेच्या विविध योजनांचा लाभ झाला आहे. तसेच बचत गट सहभागितेमुळे गांधीबाग सहकारी बँकेच्या विविध योजनांचा लाभ झाला नसणाऱ्या व या विधानासंबंधी अनिश्चितता दर्शविणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी अनुक्रमे २३.१ टक्के व ८.६ टक्के होती. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या गांधीबाग सहकारी बँकेच्या विविध योजनांचा लाभ झाला असणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

## निष्कर्ष,

नागपूर जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे स्त्रियांच्या शारीरिक आरोग्यात सुधारणा झाली असून बचत गट सहभागितेमुळे त्यांना बचतीची

सवय लागली आहे. नागपूर जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढझाली आहे. बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या गांधीबाग सहकारी बँकेच्या विविध योजनांचा लाभ झाला आहे.यामुळे गांधीबाग सहकारी बँकेच्या प्रचलीत बँक प्रणालीचा व धोरणाचा प्रभाव महिला बचत गटांच्या कार्यावर होत आहे.

## संदर्भ ग्रंथसुची


१. डॉ. आगलावे प्रदिप- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
२. डॉ. आगलावे प्रदिप, ‘नमुना निवडीचे तंत्र’, सामाजिक संशोधन पद्धती, २००७, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
३. डॉ. भांडारकर- रिसर्च मेथॉडॉलॉजी इन सोशिअल सायंस
४. डॉ. कविमंडन विजय- कृषी अर्थशास्त्र
५. डॉ. बोधनकर, सुधीर, अलोगी विवेक- सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०१३
६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-नागपूर